# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २२/०६/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंर्तगत १० कि.मी. अंतरावरील वडोदा येथे दिनांक २६/०५/२०२२ चे १६:०० ते दिनांक २६/०६/२०२२ चे १७:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्रीमती नलिनी राजु बन्सोड, वय ४५ वर्ष, रा. वडोदा ही आलमारीत पैसे ठेवण्याकरिता गेली असता आलमारीचे लॉकर हे उघडे होत व पाहणी केली असता त्यामध्ये ठेवलेले सोन्या—चांदीचे दागिने कि. ६,३०,०००/—रू. चा मुद्देमाल दिसून आला नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे सोन्याचे दागिने कि. ६,३०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक डोईफोडे मो.क्र. ९८२३३०१४७४ हे करीत आहे.

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंर्तगत अंबाडी मौदा येथे दिनांक २०/०६/२०२२ चे २२:०० ते दिनांक २१/०६/२०२२ चे ०६:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अरूण निलकंठ वानखेडे, रा. अंबाडी मौदा याने आपले राहते घराचे अंगणात ठेवलेली त्याची एमएच— ४०/बीएन— ५०४७ क्रमांकाची पांढऱ्या रंगाची ॲक्टीवा ४ जी मोपेड ही उभी करून ठेवली. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. ३५,०००/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. वेलतुर** :— आरोपी नामे— रंजीत श्रीराम मांढरे, वय ३५ वर्ष, रा. डोंगर मौदा, ता.कुही याने गावातील चौकातून घेतलेले मटन हे फिर्यादीच्या मुलास घरी नेवून देण्यास सांगीतले होते परंतु त्याने ते नेवून दिले नाही. यावरुन आरोपीचे फिर्यादी सोबत तोंडातोंडी वादविवाद झालेला होता. त्यामुळे फिर्यादी पोलीस पाटील यांचेकडे तक्रार देण्याकरिता गेली होती, यावरुन दिनांक २०/०६/२०२२ चे २०.३० वा. दरम्यान फिर्यादी ही आपले घरी टि.व्ही. पाहत असतांना आरोपीने तिचे घरात घुसून 'तु माझे विरुद्ध पोलीस पाटील यांचेकडे तक्रार का केली?' असे म्हणून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपी फिर्यादीला अश्लिल भाषेमध्ये शिवीगाळ करुन पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ४५२, ३५४, ३५४ (ब), ५०९, ३२३, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविंद्र फरकाडे मो.नं. ९८२२७६७८३३ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. वेलतुर** :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा आंभोरा येथे दिनांक २१/०६/२०२२ चे १७.०० वा. सुमारास एम.एच—४०/एन—०७१४ क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपीन नामे— राजु दयाराम बाळबूधे, वय ४० वर्ष, रा.गोन्हा याने आपल्या ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने हॉटेलजवळ रस्त्यावर असलेली फिर्यादीची आई बयनाबाई उर्फ लहानाबाई हरिचंद्र पडोळे(मृतक), वय ७० वर्ष, रा.गोन्हा हिला धडक दिली. या अपघातात तिच्या अंगावर ट्रक गेल्याने ती जागीच मरण पावली व तिचे सोबतचे फिर्यादीची वहिणी शारदा अशोक पडोळे, रा.गोन्हा व चुलत बहिण कौत्सलाबाई नारायण कुंभलकर, रा.चाफेगडी हया सुद्धा त्यामध्ये जखमी झाल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— श्रीकृष्ण हरिचंद पडोळे, वय ४८ वर्ष, रा.गोन्हा, ता.कुही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असूप गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री आनंद कविराज मो.नं.८८८८२९१२३४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**